RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ९, अंक ३८(२)] बुधवार, जून ७, २०२३/ज्येष्ठ १७, शके १९४५ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ५६**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उप विभागीय अधिकारी, ठाणे उप विभाग, ठाणे यांजकडून

**अधिसूचना**

क्रमांक टिडी/टे-५/एलएक्यु- एसआर-६० व ६१/२०२२.– ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (ज्याचा उल्लेख प्रस्तुत अधिसुचनेत यापुढे 'उक्त अधिनियम ' असा करण्यात आला आहे) च्या कलम ३ च्या खंड (इ) च्या द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७(भाग)/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश 'उक्त अधिसूचना ' असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समूचित शासन असलेल्या, ठाणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये दर्शविलेली जमीन (यापुढे जिचा निर्देश 'उक्त जमीन ' असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे असे वाटते (ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे) आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची कार्यकारी अभियंता, ठाणे खाडी पूल विभाग क्र.१, कोकण भवन, नवी मुंबई यांचे समर्पित माल वाहतूक मार्गिका प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र.४ ते बाले उत्तर शिव रस्ता तळोजा पंचानन ते निळजे कि.मी.५२/८०० येथे रेल्वे क्रॉसिंग क्र.६ ई, रेल्वे ई.पी.नं.५२/१३-१४ रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम करणे या सार्वजनिक प्रयोजनासाठी मौजे-बामाळी व मौजे- निघु, ता.जि.ठाणे, येथील अनुसूची एक मध्ये दर्शविलेल्या जमिनीची आवश्यकता आहे ;

आणि ज्याअर्थी, **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग क्र. चार-अ, क्रमांक एसआयए-२०२३/प्र.क्र.५६/अ-२, दिनांक २४ मे, २०२३ व **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग क्र. चार-अ, क्रमांक एसआयए-२०२३/प्र.क्र.८१/अ-२, दिनांक २४ मे, २०२३ अन्वये लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनच्या आणि प्रकरण तीनच्या तरतूदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आली असल्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही.

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु,उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीत, लेखी कारणे नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रर्वतनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, उप विभागीय अधिकारी, ठाणे उप विभाग, ठाणे हे भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे त्यांचा निर्देश ‘उक्त नियम’ असा करण्यात आला आहे) उक्त नियम १०च्या उपनियम ३ द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करीत आहे ;

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, ठाणे यांनी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी ठाणे, उपविभाग ठाणे यांस पदनिर्देशित केले आहे.

# अनुसूची - एक

जमिनीचे वर्णन

मौजे बामाळी, ता. जि. ठाणे

| अ.क्र | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | १/१ब | ०-०५-९२ |
| | **एकूण** | **०-०५-९२** |

मौजे निघु, ता. जि. ठाणे

| अ.क्र | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | १/२/२ | ०-००-२१ |
| २ | २२/१ | ०-०७-६५ |
| ३ | २२/२/ब/२ | ०-०१-१७ |
| ४ | ४/५अ | ०-१०-३७ |
| ५ | २२/२/अ/२ | ०-०४-९९ |
| ६ | २०/४अ | ०-०२-५४ |
| ७ | २४/१/अ | ०-२४-४९ |
| ८ | २४/१/ब/२ | |
| ९ | २४/१/क/३ | |
| १० | ५२ | ०-०३-२३ |
| ११ | ५१/२ | ०-०२-३१ |
| | **एकूण** | **०-५६-९६** |

# अनुसूची- दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव | समर्पित माल वाहतूक मार्गिका प्रकल्पातंर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते बाले उत्तर शिव रस्ता तळोजा पंचानन ते निळजे कि.मी. ५२/८०० येथे रेल्वे क्रॉसिंग क्र.६ ई रेल्वे ई.पी.नं. ५२/१३-१४ रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम करणे. |
| प्रकल्पाचे वर्णन | सदर प्रकल्पाचा मार्ग जे.एन.पी.टी ते दादरी असा असून त्यापैकी १८० कि.मी. ची लांबी महाराष्ट्र राज्यातुन जाते. महाराष्ट्रामध्ये जे.एन.पी.टी ते घोलवड या दरम्यान डेडीकेटेड फ्रेट कॉरिडर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड या रेल्वे मंत्रालयाच्या अखत्यारीतील संस्थेकडून संपूर्ण प्रकल्पाचे काम पाहिले जाते. जे.एन.पी.टी ते घोलवड या मार्गीकेमध्ये एकूण ४० लेव्हल क्रॉसिंग गेट आहेत. त्यापैकी एकूण १६ आर.ओ.बी हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येतात एकूण १६ आर.ओ.बी पैकी १० आर.ओ.बी हे मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, कोंकण यांच्यामार्फत व उर्वरीत ६ आर.ओ.बी हे मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्यामार्फत कार्यान्वीत करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या सर्व प्रकल्पांचा आढावा व संनियंत्रण मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, मूंबई ह्या कार्यालयामार्फत घेण्यात येतो. मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, मूंबई यांच्या अखत्यारीत असलेले ६ आर.ओ.बी पैकी ४ आर.ओ.बी (LC-२, LC-३, LC९C, LC६E) ची कामे कार्यकारी अभियंता, ठाणे खाडी पूल विभाग क्र.१, कोंकण भवन, नवी मुंबई या विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहे. त्यापैकी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते बाले उत्तर शिव रस्ता तळोजा पंचानन ते निळजे कि.मी. ५२/८०० येथे रेल्वे क्रॉसिंग क्र.६ ई रेल्वे ई.पी.नं. ५२/१३-१४ रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम करण्यासाठीचे भूसंपादनाचे काम जिल्हाधिकारी, ठाणे यांचेतर्फे उप विभागीय अधिकारी, ठाणे उप विभाग, ठाणे यांचेमार्फत प्रगतीत आहे. |
| समाजाला मिळणारे लाभ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते बाले उत्तर शिव रस्ता तळोजा पंचानन ते निळजे कि.मी. ५२/८०० येथे रेल्वे क्रॉसिंग क्र.६ ई रेल्वे ई.पी.नं. ५२/१३-१४ रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम या प्रकल्पामुळे जलदगती रेल्वेप्रकल्प बांधकाम करणे, त्याचा वापर करणे व देखभाल करणे याकामी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.<br><br>स्थानिक लोकांना त्यांचे कौशल्य आणि अनुभव यानुसार त्या जागेतील प्रचलित नियमानुसार रोजगाराच्या संधी मिळतील.<br><br>तसेच त्या प्रकल्पामुळे प्रवासी वाहतुकीत वाढ, सुरक्षित आणि जलद प्रवास, भौगोलिक आणि सामाजिक दृष्टीने सर्वकष विकास, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती पर्यावरण स्थिरता ह्या बाबी अभिप्रेत आहेत. |

## अनुसूची- तीन

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्यांने दिलेल्या सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)**

शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी त्यांचेकडील अधिसूचना दिनांक २६ एप्रिल २०१८ व्दारे भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ ( २०१३ चा ३० ) यामध्ये कलम १० ( क ) समाविष्ट केले असून, त्यामध्ये अशी तरतुद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसुचनेव्दारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देता येते. त्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग क्र. चार-अ, क्रमांक एसआयए-२०२३/प्र.क्र.५६/अ-२, दिनांक २४ मे, २०२३ व **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग क्र. चार-अ, क्रमांक एसआयए-२०२३/प्र.क्र.८१/अ-२, दिनांक २४ मे, २०२३ नुसार उक्त फरक प्रकल्पाला जनहिताच्या दृष्टीने लोकहितकारी प्रकल्प असल्याकारणाने प्रकरण दोन आणि प्रकरण तीन च्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आली आहे.

सदर अधिसुचनेव्दारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे ११ चे उप कलम ( १ ) खाली अधिसूचीत करणेत आले आहे. त्या विरुद्ध आक्षेप नोंदविण्याचे असल्यास प्रारंभिक अधिसूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उप विभागीय अधिकारी, ठाणे उप विभाग, ठाणे यांचे ( पत्ताः- २१७, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे कोर्ट नाका, ठाणे ( पश्चिम ) ४०० ६०१ ) कार्यालयात आक्षेप नोंदविणेत येतील.

ठाणे,
दिनांक ५जून २०२३

**अविनाश शिंदे,**
उप विभागीय अधिकारी,
ठाणे उप विभाग, ठाणे.

## BY THE SUB-DIVISIONAL OFFICER, THANE SUB-DIVISION, THANE

*NOTIFICATION*

No. TD/T-5/LAQ-SR-60 and 61/2022.—Whereas, The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (hereinafter referred to as the said Act.) has been enacted, under the powers conferred by clause (*e*) of section 3 of the said Act. Government notification, Revenue and Forest Department No. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/(भाग) अ-२, dated 11th September 2015 (hereinafter referred to as the said notification) has been published. According to the definition comprised in clause (*Z A*) of Section 3 of the said Act, it is mentioned that in connection with the acquisition of land for a public purpose for an area not exceeding 10000 hectares in a district, the Collector of such district shall be deemed to be an Appropriate Government for the purpose of the said Act;

And, whereas, the Appropriate Government *i.e.* Dist. Collector of Thane has come to the conclusion that the land indicated in Schedule-I attached herewith are required as per the said notification (hereinafter referred to as the said land). For the public purpose the details of which are given in Schedule-II attached herewith. And hence, under sub-section (*1*) of Section 11 of the said Act, it is hereby notified that the said lands are required for the public purpose of the Executive Engineer, Thane Creek Bridge Div. No.1, Kokan Bhavan, Navi Mumbai to Construction of Oropsed Dedicated Freight Corridor (DFC) project of Railway Over Bridge (ROB) in lieu of LC-6E at Rly Km 52/800, in Diva-Panvel section Railway Km.52/12-14 on Bale Uttar shiv road to NH-4 road to lands of **Village- Bamali & Nighu, Tal. & Dist. Thane** needed for the said public purpose shown in Schedule –I.

And, whereas, Government of Maharashtra's Extraordinary Gazette No. Part Four-A, No. SIA.2023/C.R.56/A-2, dated 24th May 2023 and Government of *Maharashtra's Extraordinary Gazette* No. Part Four-A, No. SIA.2023/C.R.81/A-2, dated 24th May 2023, has resolved that Public – Private Partnership mentioned in Section 10A of the said Act with the said projects in which land ownership will be continued with the State Government. Since such projects were exempted from the provisions of chapter two and three of the said Act, there is no need to determine the social impact for this project;

Therefore, it is hereby declared that no person, in accordance with sub-section (*4*) of section 11 of the said Act, shall make any transaction of the said land or shall create any third party interest in the said land, or any part thereof from the date of publication of this notification till the completion of the proceedings under chapter IV of the said Act ; Provided that, upon application by the owner of the said land or part thereof, the Collector may, in special circumstances, exempt such owner from the effect of the above provision by mentioning reasons in writing ;

However, any loss or damage caused to any person in violation of this provision purposely made will not be compensated by the Collector.

It is further declared that according to sub-section (*5*) of section 11 of the said Act, the Sub-Divisional Officer, Thane Sub-Division, Thane is going to undertake and complete the exercise of updating of land records as prescribed by sub-rule (3) of rule 10 of the Right to Fair Compensation and Transparency Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014 (hereinafter referred as the said rules),

Similarly, under the provision of sub-section (*g*) of section 3 of the said Act, the Collector being Appropriate Goverment is empowerd to designate Sub-Divisional Officer, Thane Sub-Division, Thane to carry out the functions of the Collector.

## SCHEDULE - I

Description of Land

Name of the Village Bamali, Taluka Thane, District Thane

| Sr. No. | Survey No. | Area (H R) |
|---|---|---|
| 1 | 1/1B | 0-05-92 |
| | **Total** | **0-05-92** |

Name of the Village Nighu, Taluka Thane, District Thane

| Sr. No. | Survey No. | Area (H R) |
|---|---|---|
| 1 | 1/2/2 | 0-00-21 |
| 2 | 22/1 | 0-07-65 |
| 3 | 22/2/B/2 | 0-01-17 |
| 4 | 4/5A | 0-10-37 |
| 5 | 22/2/A/2 | 0-04-99 |
| 6 | 20/4A | 0-02-54 |
| 7 | 24/1/A | 0-24-49 |
| 8 | 24/1/B/2 | |
| 9 | 24/1/C/3 | |
| 10 | 52 | 0-03-23 |
| 11 | 51/2 | 0-02-31 |
| | **Total** | **0-56-96** |

**SCHEDULE - II**

**Statement on the nature of public purpose**

| | |
|---|---|
| Name of the Project | Construction of Proposed Dedicated Freight Corridor (DFC) project of Railway Over Bridge (ROB) in lieu of LC- 6E At Rly Km 52/800, on Diva-Panvel section Railway Km.52/13-14 on Bale Uttar shiv Road to NH-4 Road. |
| Description of Project Work | Construction of Proposed Dedicated Freight Corridor (DFC) project of Railway Over Bridge (ROB) in lieu of LC- 6E At Rly Km 52/800, on Diva-Panvel section Railway Km.52/13-14 on Bale Uttar shiv Road to NH-4 Road. For the proposed project oft Dedicated Freight Corridor between JNPT and Dadari about 180 km length lies in Maharashtra state. Execution work between JNPT & Gholvad is governed / Monitored by Railway department (DFCCIL). There are total 40 existing Level Crossing (LC) gates between JNPT to Gholvad. Out of which 16 ROB's (LC) lies under the jurisdiction of Public Works Department. Out of 16 ROB's (LC), 10 ROB's (LC) is decided to be executed by Chief Engineer, Kokan and remaining 6 ROB's (LC) is decided to be executed by Chief Engineer, Mumbai. Progress and monitoring of all these ROB's (LC) project is done by Chief Engineer, Mumbai. Out of 6 ROB's (LC) (LC-2, LC-3, LC9C, LC6E) execution of 4 ROB's (LC) is carrying out under Executive Engineer,Thane Creek Bridge Div No.1, Konkan Bhavan, Navi Mumbai. Land acquisition for the project of Railway Over Bridge (ROB) in lieu of LC- 6E At Rly Km 52/800, on Diva-Panvel section Railway Km.52/13-14 on Bale Uttar shiv Road to NH-4 road is in progress under office of Sub-Divisional Officer, Thane Sub-Division, Thane of Collector office Thane. |
| Benefits to the Society | Construction of Proposed Dedicated Freight Corridor (DFC) project of Railway Over Bridge (ROB) in lieu of LC- 6E At Rly Km 52/800, on Diva-Panvel section Railway Km.52/13-14 on Bale Uttar shiv Road to NH-4 Road project will provide employment opportunities for the construction operation and maintenance.<br>Opportunities of various jobs as per the skill & experiences shall be made available to the needy person, as per the rules.<br>Geographical & social development in all aspect of life shall be improved, shall result in employment generation. Environmental conditions shall be stable.<br>Due to this project there will be increase in number of passengers as the fast & safe journey will be provided. |

## SCHEDULE - III

**(Social impact assessment summary given by the officers conducting the social impact assessment study)**

The Government, in Revenue and Forest Department, has published a notification in Government Extraordinary Gazette dated 26/04/2018 and amended section 10 (A), of The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act 2013 (30 of 2013) which provides that the appropriate government may, by notification in the public interest, be exempted from the application of the provisions of Chapter Two and Chapter Three of the said Act. Accordingly the notification by Government of Maharashtra has been published in Government of *Maharashtra's Extraordinary Gazette* No. Part Four-A, No. SIA.2023/C.R.56/A-2, dated 24th May 2023 and Government of *Maharashtra's Extraordinary Gazette* No. Part Four-A, No. SIA.2023/C.R.81/A-2, dated 24th May 2023, and the said project is exempted from the application of the provision of chapter Two and Three being a public interest project in terms of public interest.

The land which is required for public purpose or is likely to be required under sub-section (*1*) of section 11 of the Act has been notified by this notification If any objection is to be lodged against it, the objection will be lodged in the office of Sub-Divisional Officer, Thane Sub-Division, Thane [Address:- 217, 2nd Floor, Collector Office, Thane Court Naka, Thane (West) 400 601] within 60 days from the date of preliminary notification.

Thane,
Dated 5th June 2023.

AVINASH SHINDE,
Sub-Divisional Officer,
Thane Sub-Division, Thane.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.